**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात विविध ठिकाणी झालेल्या रोजगार मेळाव्यातून ५१ हजार युवकांना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नियुक्तीपत्रांचं वाटप, राज्यातही विविध ठिकाणी रोजगार मेळाव्याचं आयोजन

- नवी मुंबई विमानतळाचं काम सप्टेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना

- राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी राजीनामा दिल्याच्या वृत्ताचं जितेंद्र आव्हाड यांच्याकडून खंडन

**आणि**

- अँडरसन-तेंडुलकर कसोटी मालिकेतल्या तिसऱ्या सामन्यात के. एल. राहुलची शतकी खेळी

**<><><><>**

युवकांचं सक्षमीकरण आणि विकसित भारतात त्यांचं योगदान वाढवण्यासाठी रोजगार मेळावे महत्त्वाची भूमिका बजावतात असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. देशभरात ४७ ठिकाणी आयोजित १६व्या रोजगार मेळाव्याला ते संबोधित करत होते. त्यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे विविध सरकारी विभागांत नव्यानं नियुक्त झालेल्या युवकांना ५१ हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण केलं. या उपक्रमामुळे लाखो तरुणांना केंद्र सरकारमध्ये कायमस्वरूपी नोकऱ्या मिळाल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. देशात स्टार्टअप्स, नवोन्मेष आणि संशोधन या क्षेत्रांमध्ये वाढ होत असल्यामुळे देशातल्या तरुणांच्या क्षमताही वाढत असल्याचं ते म्हणाले.

***होल्ड... बाईट- नरेंद्र मोदी***

**<><><><>**

राज्यात मुंबई, पुणे आणि नागपूरमध्ये आज रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री मंत्री पियुष गोयल यांनी मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथल्या रोजगार मेळाव्याला उपस्थित राहून १८९ नवनियुक्तांना

नियुक्तीपत्रांचं वाटप केलं. हा दिवस फक्त नोकरी मिळण्याचा नाही, तर देशाच्या विकासात योगदान देण्याची सुवर्णसंधी आहे, असं ते यावेळी म्हणाले. तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर इथून या कार्यक्रमात भाग घेतला आणि १४८ जणांना नियुक्तीपत्रं वितरित केली. शासकीय नोकरी ही चांगली समाजसेवा तसंच देश सेवा करण्याची संधी समजून आपलं कर्तव्य योग्य पद्धतीनं पार पाडावं आणि त्यात यशस्वी व्हावं असं आवाहन त्यांनी यावळी नवनियुक्तांना केलं. पुण्यातल्या रोजगार मेळाव्यात नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते ११४ जणांना नियुक्तीपत्रांचं वाटप करण्यात आलं.

**<><><><>**

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज नागपुरातल्या म्युनिशन इंडियाच्या NADP अकॅडमीमधल्या संरक्षण क्षेत्रातल्या व्यवस्थापन पदविका अभ्यासक्रमाच्या पहिल्या दीक्षांत समारंभाला संबोधित केलं. या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता आणण्यात मोठा हातभार लावतील, असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

**<><><><>**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं काम ३० सप्टेंबरपूर्वी पूर्ण करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह त्यांनी या विमानतळाची पाहणी केली आणि आणि धावपट्टीपासून ते टर्मिनल इमारतीपर्यंतच्या प्रगतीची माहिती घेतली. त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. हा देशातला सगळ्यात अद्ययावत प्रकल्प ठरणार असून या विमानतळाचं ९४ टक्के काम पूर्ण झालं आहे. धावपट्टी आणि टर्मिनल इमारतीचं कामही पूर्ण झालं आहे. आता आतल्या भागाचं काम सुरू आहे, असं त्यांनी सांगितलं. ते म्हणाले,

***होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस***

मुंबई-पुणे मिसिंग लिंकचीही पाहणी त्यांनी केली. या मार्गामुळे प्रवासासाठी लागणारा वेळ अर्ध्या तासाने, तर अंतर सहा किलोमीटरने कमी होईल, तसंच मुंबई-पुणे एक्सप्रेसवेवरची वाहतूक कोंडी कमी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><>**

मराठा इतिहासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या १२ गड किल्ल्यांना युनेस्कोच्या जागतिक वारसास्थळांच्या यादीत स्थान मिळाल्याबद्दल राज्यात सर्वत्र आनंद व्यक्त होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी या निर्णयाबद्दल आनंद व्यक्त केला. दादरच्या शिवाजी पार्क इथं केंद्रीय मंत्री पियुष गोयल, मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशीष शेलार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. शिवरायांनी स्वराज्य उभारून संपूर्ण भारत एकत्र केला. त्यांच्या किल्ल्यांचा समावेश युनेस्कोच्या यादीत झाल्यामुळे जगभरातले पर्यटक आता या किल्ल्यांना भेट देतील. यामुळे पर्यटन अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास पियुष गोयल यांनी यावेळी व्यक्त केला. भाजपातर्फे उद्याही मुंबईत १०६ ठिकाणी शिवरायांची आरती आणि शिवजल्लोष साजरा केला जाणार आहे.

रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी, या यादीत महाराष्ट्रातल्या ११ किल्ल्यांचा समावेश होणं ही राज्यासाठी आणि कोकणवासीयांसाठीही अभिमानाची बाब आहे, असं प्रतिपादन केलं. ही स्थळं म्हणजे आपली मंदिरं आहेत, असंही ते म्हणाले.

सातारा जिल्ह्यातल्या प्रतापगड किल्ल्याचाही यात समावेश असल्यामुळं जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेल्याची भावना साताऱ्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी व्यक्त केली.

**<><><><>**

आषाढी वारीनिमित्त यंदा एसटीनं ५ हजार २०० जादा बसगाड्यांद्वारे साडे एकवीस हजार फेऱ्यांद्वारे जवळपास १० लाख भाविकांना विठ्ठलाचं दर्शन घडवलं. या सेवेतून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपयांचं उत्पन्न मिळाल्याची माहिती परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. महामंडळानं गेल्या वर्षीपेक्षा यंदा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपये जास्त उत्पन्न मिळवलं. लाखो भाविकांना सुखरुप देवदर्शन घडवून आणणारे हजारो चालक, वाहक, यांत्रिकी कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकाऱ्यांचं मंत्री नाईक यांनी अभिनंदन केलं.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पदाचा राजीनामा दिल्याच्या बातम्या काही प्रसारमाध्यमांनी दिल्या होत्या. मात्र, पक्षाचे राष्ट्रीय

प्रवक्ते जितेंद्र आव्हाड यांनी या बातम्या म्हणजे निव्वळ खोडसाळपणा असल्याचं समाजमाध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. जयंत पाटील हेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आहेत. पक्ष एका नियमानुसार आणि शिस्तीनुसार चालतो, असंही त्यांनी नमूद केलं आहे.

**<><><><>**

अतिवृष्टी आणि पुरामुळे संपूर्ण भंडारा जिल्ह्यातल्या सातही तालुक्यांमध्ये ४ हजार ९३६ हेक्टरवरच्या पिकांचं मोठं नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक नजर अंदाजात दिली आहे. जिल्ह्यात ८ आणि ९ जुलै या दोन दिवसांमध्ये जवळपास २४० मिलिमीटर पाऊस पडला. वैनगंगा आणि चूलबंद नदीला पूर येऊन जमीन पाण्याखाली गेली. तीन दिवस शेतात पाणी साचून राहिलं. यामुळे बळीराजाचं मोठं नुकसान झालं आहे.

**<><><><>**

धुळ्याच्या गुलमोहर शासकीय विश्रामगृहातून सुमारे दोन कोटीची रोख रक्कम जप्त केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध खंडणी गोळा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मे महिन्यात विधिमंडळ अंदाज समितीच्या धुळे जिल्ह्याच्या दौऱ्यावेळी विश्रामगृहातल्या एका खोलीत ही रक्कम आढळून आली होती.

**<><><><>**

हिमोफीलिया या आजारावरच्या हेमलिब्रा या इंजेक्शनचं लोकार्पण परभणीच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते आज परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात झालं. हे इंजेक्शन उपलब्ध झालेला परभणी हा राज्यातला पहिला जिल्हा आहे. या आजाराच्या रुग्णांना आता उपचारासाठी जिल्ह्याबाहेर जायची गरज पडणार नाही, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. बोर्डीकर यांनी हिमोफीलियाग्रस्त रुग्णांची, तसंच जिल्हा रुग्णालयात पहिल्यांदाच कर्करोगाची शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णाला भेटून त्यांची विचारपूस केली.

**<><><><>**

भारत आणि इंग्लडदरम्यान अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट स्पर्धेत तिसऱ्या सामन्यात चुरस निर्माण झाली आहे. लंडनच्या लॉर्ड्स मैदानावर यजमान इंग्लंडविरुद्ध तिसऱ्या दिवशी भारतानं ३ गडी बाद १४५ धावांवरून पुढे खेळायला सुरुवात केली. के. एल. राहुल यानं कसोटीतलं दहावं शतक झळकवलं. तर रिषभ पंतने ७४ धावा फटकावल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या ५ गडी बाद २७८ धावा झाल्या होत्या.

**<><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंडच्या संघांदरम्यान पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेतला पाचवा सामना आज रात्री होणार आहे. ही मालिका भारतानं ३-१ अशी जिंकली आहे. आजचा सामना जिंकून यात एका विजयाची भर घालायचा भारताचा प्रयत्न आहे. हा सामना रात्री ११ वाजता बर्मिंगहॅम इथं सुरू होईल.

**<><><><>**

येत्या २४ तासांत कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाची शक्यता आहे तर तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यात तुरळक आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाचा अंदाज आहे.

**//<><><><>//**